नि.दि.दावा क्र.१४/२०१६

संत गजानन महाराज –वि.– अमर शर्मा

नि.क्र.२७१ लगत

**<u>प्रतिवादीचे सा.क्र. १ यांचा पुढील सरतपास प्रतिवादीचे वकील श्री. एन. सी. वाघ यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>**

३१. माझे पुराव्याचे शपथपत्र मी दाखल केलेले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. ते नि.क्र.२७१ वर आहे.

३२. आता मला मुल्यांकनपत्र दाखविण्यात आले. त्याला **<u>नि.क्र.२८०</u>** देण्यात येते.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास वादीचे विधीज्ञ श्री. जी. के. सारडा यांच्यामार्फत सुरु...</u>**

३३. आता मला नि.क्र.११७ दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.११७ वरील करार नोंदणीकृत असून त्यावर माझी सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.११७ वरील करार दि.०१.०६.२०११ ते दि.३०.०४.२०१२ या कालावधीकरीता झाला होता.

प्रश्न – नि.क्र.११७ वरील करारानुसार तुम्ही दि.०१.०६.२०११ ते दि.३०.०४.२०१२ या कालावधीकरीता २,४००/– रुपये दरमहा मोबदला दिला होता.

उत्तर – भाडे दिले होते.

३४. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ज्यावेळेस मी वादीला दुकानापोटी रक्कम दिली त्या त्यावेळेस वादीने मला त्या रक्कमेची पावती दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हापासून माझ्या दुकानामध्ये माझे वास्तव्य होते तेव्हापासून वादीसोबत माझा लेखी करार झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझा वादीसोबत कधीही तोंडी करार झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २००६ मध्ये पहिल्यांदा माझ्या नावाचा लेखी करार करण्यात आला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यापूर्वीचे करार माझ्या वडीलांच्या नावाने होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २००६ ते २००९ या कालावधीचा करार मी अभिलेखावर दाखल केलेला आहे. आता मला नि.क्र.२६६ वरील दि.१५.०७.२००६ चा करार दाखविण्यात आला. तो तोच आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.२६६ वरील कराराचा कालावधी

दि.०१.०६.२००६ ते दि.३०.०४.२००९ असा होता. हे म्हणणे खरे आहे की, दि.०१.०६.२००९ पासून ते दि.०१.०६.२०११ या कालावधीत वादीने माझ्यासोबत दोन लेखी करार केले होते.

प्रश्न – दि.०१.०६.२००९ ते दि.३०.०४.२०१० पर्यंत तुम्ही दुकानाची मासिक किती परवाना फी दिली होती ?

उत्तर – मी १,७००/– रुपये प्रतिमाह भाडे दिले होते.

प्रश्न – दि.०१.०६.२०१० ते दि.३०.०४.२०११ पर्यंत तुम्ही दुकानाची मासिक किती परवाना फी दिली होती ?

उत्तर – मी २०००/– रुपये प्रतिमाह भाडे दिले होते.

३५. रुपये २,०००/– भाडे दिल्याची माझ्याकडे पावती आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.०१.०६.२०१० ते दि.३०.०४.२०११ पर्यंत दुकानाची परवाना फी प्रतिमाह २,०००/– रुपये होती. माझ्या पुराव्याच्या शपथपतरातील परिच्छेद क्र.१३ मध्ये नमुद केल्यानुसार सन १९७२–७३ मध्ये कायमचा भाडेपट्टा तयार झाल्याचा माझ्याकडे कोणताही दस्त उपलब्ध नाही.

३६. सन १९७२–७३ मध्ये मी भाडेकरु नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.६ च्या तिसऱ्या ओळीमध्ये नमुद केलेला दस्त हा नि.क्र.११७ वर आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.६ मध्ये नमुद केल्यानुसार भाडे नियंत्रण कायदा १९९९ ची तरतुद नि.क्र.११७ वरील दस्ताला लागू होणार नसल्याच्या अटीचा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.६ मध्ये नमुद केल्यानुसार इजमेंट ॲक्ट किंवा ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट करार मिळवून घेण्याचा वादीचा उद्देश होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे सदरचा दावा हा महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्याअंतर्गत चालणारा नसल्याने खारीज होण्यास पात्र असल्याची माहिती मी माझ्या विधीज्ञांना दिली होती.

३७. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.१२ मध्ये नमुद केल्यानुसार महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्याअंतर्गत हे न्यायालय स्थापन झाले नाही कारण की आमच्या दुकानाचे मुल्यांकन ७,३०,०००/– रुपये आहे व या न्यायालयाला ५,००,०००/– रुपये पर्यंतचे दावे चालविण्याचा अधिकार आहे. मला लघुवाद न्यायालयाबद्दल काही माहिती नाही. माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.१२ मध्ये नमुद केल्यानुसार महाराष्ट्र भाडे

नियंत्रण कायद्याच्या तरतुदी या प्रकरणाला लागु होणार नाही याबाबत मला काही सांगता येणार नाही. सदरचे प्रकरण महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्याच्या अंतर्गत दाखल केलेले आहे याबाबत मला माहिती आहे.

प्रश्न – माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.१२ मध्ये नमुद केल्यानुसार महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्याच्या अंतर्गत सदर प्रकरण या न्यायालयात दाखल करता येवू शकत नाही याबाबत तुम्हाला काही माहिती आहे का ?

उत्तर – याबाबत माझे विधीज्ञ सांगू शकतात.

३८. हे म्हणणे खरे आहे की, मी वादीविरोधात महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायद्याचे कलम २९ नुसार या न्यायालयात दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या दाव्यामध्ये वादीने बॅरीकेट लावल्याने मुख्य दरवाजा बंद झाल्यामुळे व दोन गेट उघडल्यामुळे दुकानासमोरील कॅरीडोर बंद झाल्यामुळे आम्हाला मिळणाऱ्या सुविधा न मिळत असल्यामुळे त्यासाठी सदर दाव्यात दाद मागितली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेला दावा मी बिनशर्त मागे घेतला कारण की बंद झालेल्या सुविधा सुरु झाल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, मी व इतर ११ लोकांनी दुकानामध्ये ते भाडेकरु असल्याची घोषणा होण्याकरीता खामगाव न्यायालयात दावा दाखल केला असून तो प्रलंबीत आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी दाखल केलेला दावा मागे घेतल्यानंतर काही वर्षांनी वादीने परत सुविधा बंद केल्या.

३९. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात वादपत्राला जबाब देण्यापूर्वी वादीने दाखल केलेल्या सर्व दस्ताची प्रत आम्हाला मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणात आम्हाला प्राप्त झालेल्या दस्तानुसार पोलीस विभाग, जिल्हाधिकारी विभाग, महाराष्ट्र शासन व धर्मदाय आयुक्त यांनी मंदिराच्या सुरक्षिततेसाठी वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शासनाच्या निर्देशानुसार मंदिरात प्रवेश करण्याचा गेट व मंदिरातून बाहेर निघण्याचा गेट वेगवेगळे ठेवण्याचे निर्देश होते. हे म्हणणे खरे आहे की, मंदिरात येणाऱ्या प्रत्येक भाविकाची व त्याच्या सोबत असलेल्या सामानाची तपासणी केल्यानंतरच त्याला मंदिरात प्रवेश देण्यात यावे असे निर्देश शासनाने दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानुसार मंदिरात भाविकांना प्रवेश करण्याचा व मंदिरातून बाहेर जाण्याचा वेगवेगळे गेट तयार करण्यात आले. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, वादीने मंदिरामध्ये वेगळे गेट तयार केले व व्यापारी संकुलामध्ये वेगळे गेट तयार केले. साक्षीदार परत स्वतःहून सांगतो

की, भक्तांचे येणे जाणे व्यापारी संकुलामध्ये तयार केलेल्या गेटमधून नाही. हे म्हणणे खरे आहे की, वादीने प्रत्येक भाविकाची व त्याच्या सामानाची तपासणी करण्याची वेगळी यंत्रणा तयार केली. हे म्हणणे खरे आहे की, भाविकाची व त्याच्या सामानाची तपासणी झाल्याशिवाय मंदिरात प्रवेश दिल्या जात नाही. मांडरा देवी प्रकरणात गठीत करण्यात आलेल्या समितीचे उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती अध्यक्ष होते व त्या प्ररकणात उच्च न्यायालयाच्या न्यायमुर्तीने दिलेल्या निर्देशानुसार मंदिरामध्ये भाविकांची व त्यांच्या सामानाच्या सुरक्षिततेची यंत्रणा निर्माण करण्यात आली होती की काय हे मला माहिती नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मांडरा देवी मंदिरातील परिस्थिती वेगळी आहे व शेगाव येथील गजानन महाराज मंदिरातील परिस्थिती वेगळी आहे तसेच शेगाव येथील गजानन महाराज मंदिरात चेंगराचेंगरी होवू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस विभागाकडून मंदिरात दहशतवादी कारवाया व बॉम्ब स्फोट होवू शकते याबाबतचे निर्देश देण्यात आले होते.

४०. नि.क्र.११७ वरील कराराची मुदत सन २०१२ मध्ये संपल्यानंतर त्या कराराची मुदत वाढवून देण्याची मागणी मी वादीकडे केली होती. हे म्हणणे खरे नाही की, महाराष्ट्र शासन व पोलीस विभागाने दिलेल्या निर्देशानुसार मंदिर परिसरात वाणिज्यकृत्य करता येवू शकत नसल्याने कराराची मुदत वाढवून देता येणार नाही असे वादीने मला कळविले होते. वादीने मुदत वाढवून मिळणार नसल्याचे मला कळविले नव्हते. मुदत वाढवून देण्याच्या मी केलेल्या मागणीवर वादीने कोणतेही उत्तर दिले नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझे वडील व इतर गाळेधारक शिवशंकर पाटील यांना भेटायले गेले असता तेथे हजर असलेल्या कर्मचाऱ्यांनी माझ्या वडीलांना व इतर गाळेधारकांना शिवशंकर पाटील यांना भेटू दिले नाही. ज्यावेळेस माझे वडील व इतर गाळेधारक शिवशंकर पाटील यांना भेटायला गेले होते त्यावेळेस दोन इमारतीमधील एकुण गाळेधारकांची संख्या ५८ होती. दि.३०.०४.२०१२ रोजी मुदत संपल्यानंतर १५ ते २० दिवसांनी माझे वडील व इतर गाळेधारक शिवशंकर पाटी यांना भेटायले गेले होते.

४१. आता मला नि.क्र.११८ वरील ताबे पावती दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ११ महिन्याचा करार संपल्यानंतर ताबा पावती व्हायची व त्यानंतर १५ ते २० दिवसांनी नवीन करार व्हायचा. आता मला नि.क्र.११९ वरील विनंती अर्ज दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. दि.०२.०५.२०१२ पर्यंत दोन इमारतीमध्ये ५८ गाडेधारक होते. हे म्हणणे खरे आहे की, ५८ गाळेधारकाचा स्वतंत्र वैयक्तीक करार होता. हे म्हणणे खरे आहे की, ५८ गाळेधारकांची कराराची मुदत

दि.३०.०४.२०१२ रोजी संपलेली होती. हे म्हणणे खरे आहे की, ५८ गाळेधारक करार वाढवून घेण्यासाठी वादीकडे गेले होते. माझ्या व्यतिरिक्त इतर गाळेधारकांनी केलेला करार, त्याची मुदत, त्यांनी केलेले विनंती अर्ज व त्यांनी करुन दिलेली ताबापावती याबाबत मला माहिती आहे. मी करुन दिलेल्या ताबेपावतीप्रमाणे उर्वरित गाळेधारकांनी सुध्दा ताबापावती करुन दिली होती की काय हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी ४ महिने मुदत वाढवून देण्याकरीता वादीकडे विनंती अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मला सामान काढण्यासाठी वादीने ४ महिन्याची मुदत वाढवून दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, ५८ गाळेधारकांपैकी ४६ गाळेधारकांनी त्यांचे गाळे खाली करुन दिले होते. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ४६ गाळेधारकांवर दबाव आणल्यामुळे त्यांनी गाळे खाली करुन दिले होते. ४६ गाळेधारकांपैकी ४ गाळेधारकांनी दुकाने परत मिळण्यासाठी कायदेशीर कार्यवाही केली होती. दिवाणी दावा दाखल केलेल्या ४ गाळेधारकांचे नावे नागलकर, धानुका, चौथे होते व चौथ्या गाळेधारकाचे नाव मला आता आठवत नाही. दिवाणी दावा दाखल केलेल्या ४ गाळेधारकांनी त्यांनी दाखल केलेले दावे परत घेतले होते. ४ गाळेधारकांनी दिवाणी दावे केव्हा मागे घेतले याबाबत मला सांगता येणार नाही.

४२. माझ्या जबाबात नमुद केल्यानुसार नि.क्र.११७ करुन देतांना माझ्यावर दबाव, अवाजवी प्रभाव आणून फसवणुक केली होती याबाबतचे सविस्तर तथ्य मी माझ्या विधीज्ञांना जबाब तयार करतांना सांगितले होते. विश्वस्थांनी माझ्यावर दबाव व अवाजवी प्रभाव आणून फसवणुक केल्याने नि.क्र.११७ वरील दस्त करुन देण्यात आले होते. विश्वस्थांनी दबाव व अवाजवी प्रभाव आणून फसवणुक केल्याने नि.क्र.११७ वरील दस्त करुन देण्यात आले होते हा मजकूर मी माझ्या जबाबात नमुद केला नाही. परंतु मी तो मजकूर आता माझ्या लेखी जबाबामध्ये नमुद करेल. साक्षीदार आता सांगतो की, १२ विश्वस्थ यांनी दबाव व अवाजवी प्रभाव आणून फसवणुक केली होती. सन २०११–१२ मध्ये असलेल्या १२ विश्वस्थांचे नाव मला सांगता येणार नाही कारण की ते विश्वस्थ नेहमी बदलत राहतात. निळकंठ शिवशंकर पाटील सन २०१२ मध्ये सदस्य होते. त्यावेळेस व्यवस्थापकीय विश्वस्थ शिवशंकर पाटील होते. नि.क्र.११७ वरील दस्त नोंदणी करण्यासाठी मी नोंदणी कार्यालयात गेलो होतो. नि.क्र.११७ वरील दस्त मी वाचला नाही. नि.क्र.११७ वरील दस्तावर मी किती व कोणत्या जागेवर सह्या केल्या आहेत याबाबत मला माहिती नाही. नि.क्र.११७ वरील दस्त नोंदणी करण्याकरीता माझ्यावर विश्वस्थांनी दबाव आणल्याची माहिती मी कोणालाही दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.११७ वरील दस्त दबाव व अवाजवी प्रभाव आणून फसवणुक

करुन करुन घेण्यात आल्याची तक्रार किंवा नि.क्र.११७ वरील दस्त रद्द करुन घेण्यासाठी कोणताही दावा मी आजपर्यंत केला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, याबाबत आम्ही शेगाव शहर पोलीस स्टेशन येथे गेलो असता तेथे आमची तक्रार घेण्यात आली नाही. नि.क्र.११७ वरील करार झाल्याच्या १ महिन्यानंतर आम्ही १२ लोक शेगाव शहर पोलीस स्टेशन येथे गेलो होतो. नि.क्र.११७ वरील करार करतांना माझ्यामध्ये व वादीमध्ये कोणताही वाद नव्हता. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, वादीसोबत विश्वासाचे संबंध तयार झाल्यामुळे वादी जिथे म्हणेल तिथे आम्ही सह्या करीत होतो. नि.क्र.११७ वरील कराराचे नविनीकरण न केल्यामुळे पहिल्यांदा माझा वादीसोबत वाद उद्भवला होता.

४३. नि.क्र.११८ व नि.क्र.११९ वरील अनुक्रमे ताबापावती व विनंती अर्ज तयार करतांना आमच्यावर दबाव व अवाजवी प्रभाव आणून फसवणुक केल्याबाबतचे तथ्य लेखी जबाब तयार करतांना आम्ही आमच्या विधीज्ञांना तोंडी सांगितले होते. माझ्या जबाबामध्ये त्याबाबत सविस्तर तथ्य का नमुद नाहीत याबाबतचे कोणतेही कारण मला सांगता येणार नाही. नि.क्र.११८ व नि.क्र.११९ वरील अनुक्रमे ताबापावती व विनंती अर्ज तयार करतांना माझ्यावर दबाव व अवाजवी प्रभाव आणून फसवणुक केल्याबाबतचे तथ्य पुराव्याचे शपथपत्र तयार करतांना आम्ही आमच्या विधीज्ञांना सांगितले नव्हते.

४४. हे म्हणणे खरे आहे की, खाली झालेल्या ४६ दुकानापैकी १७ दुकाने सिमेंटच्या छत्रीच्या आकाराची दुकाने होती. हे म्हणणे खरे आहे की, १७ छत्रीचे दुकाने नष्ट करण्यात आले व ती जागा मोकळी करण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, त्या जागेचा उपयोग भाविकांची पादत्राणे ठेवण्यासाठी केला जातो. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ती जागा मोकळी आहे. हे म्हणणे खरे आहे की, दोन इमारतीपैकी पश्चिमेकडील इमारतीच्या पहिल्या मजल्यावर वादीचा दवाखाना होता. हे म्हणणे खरे आहे की, तो दवाखाना २०१२ पर्यंत सुरु होता. हे म्हणणे खरे आहे की, दोन इमारतीपैकी पुर्वेकडील इमारतीच्या पहिल्या मजल्यावर अपंगाचा दवाखाना व वाचनालय होता. अपंगाचा दवाखाना व वाचनालय सन २०१७–१८ पर्यंत सुरु होते की काय याबाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, दवाखाना व अपंगाचा दवाखाना वादींनी खामगाव रोडवर स्थानांतरीत केले. वाचनालय खामगाव रोडवर वादीने स्थानांतरीत केले होते की काय याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दोन इमारतीचे पहिले मजले खाली करुन त्यामध्ये कुलुप लावण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही इमारतीचे पहिले मजले वादीने पाडू नये याकरीता दि.२७.०९.२०२१ रोजी मी मनाई हुकुम मागितला होता. दि. २७.०९.२०२१ रोजी केलेला

मनाई हुकुमाचा अर्ज खारीज करण्यात आला.

४५. हे म्हणणे खरे आहे की, मंदिरामध्ये भाविक, सेवेकरी व मंदिराची निगा राखणाऱ्याला मंदिरामध्ये प्रवेश दिल्या जातो. हे म्हणणे खरे आहे की, मंदिरात कोणतेही व्यापारी कृत्य करु दिल्या जात नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, वादी बाजार क्षेत्रात असलेल्या वादीकडून आम्ही भाड्याने घेतलेल्या दुकानात वादीने बॅरीकेट लावल्याने व्यापारी कृत्य आम्हाला करु देत नाही. आमच्या दुकानात आम्ही स्वतः माल आणतो व आम्ही व्यापाऱ्यांना आमच्या दुकानात येवू देत नाही.

प्रश्न – तुमच्या दुकानात मजुरांमार्फत माल व्यापारी आणून देतात व तुम्ही आणता ?

उत्तर – आम्ही मजुरांमार्फत माल आमच्या दुकानात आणत नाही. आम्ही स्वतःच आमच्या दुकानात माल आणतो.

४६. आमच्या दुकानात येणाऱ्या मालाची आमच्याकडून तपासणी केली जाते. आमच्या दुकानात आमच्याकडून ग्राहकाची तपासणी केल्या जात नाही. नि.क्र.११७ मधील अटी व शर्तीचे आम्ही पुर्णपणे पालन केलेले आहे. आमच्या दुकानात सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावलेले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या दुकानात येणाऱ्या मालावर व ग्राहकावर वादीचे नियंत्रण आहे. वादी मेटल डिटेक्टरपासून आमचे ग्राहक परत पाठवून देतात, अशा प्रकारचे नियंत्रण वादी आमच्या दुकानावर ठेवतात. मेटल डिटेक्टरवर दहा बारा सेवाधारकांची नियुक्ती केली असून ते सेवाधारक आमच्या ग्राहकाला तेथूनच परत पाठवून देतात, अशा प्रकारचे नियंत्रण वादी आमच्या दुकानावर ठेवतात. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दुकानात येणारा माल आम्ही फुटपाथवर जावून विकतो. साक्षीदार आता सांगतो की, मंदिराच्या मुख्य द्वाराजवळून ग्राहक आम्हाला फोन करतो व आम्ही त्याला धार्मीक पुस्तके तेथे नेवून त्याला विकतो. आम्ही खरेदी केलेला व विक्री केलेल्या मालाचा हिशोब ठेवतो. माल विक्री केल्यापासून मला किती उत्पन्न होते याबाबतचा मी हिशोब ठेवतो व आयकर विवरण सुध्दा भरतो. सन २०२० पासून माझ्या दुकानापासून मला मिळणारे उत्पन्न पुर्णपणे बंद झालेले आहे.

४७. आता मला आमचे संकुल व मंदिराच्या दरवाजाचे ९ फोटो दाखविले. सदरचे फोटो गजानन महाराज प्रगट दिनाच्या दिवशीचे आहेत. ते फोटो आमचे संकुल व मंदिराच्या दरवाजाचे आहेत. त्याला **नि.क्र.२८१–१ ते २८१–९** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.२८१–१ ते नि.क्र.२८१–९ वर असलेले फोटो सन २०१२ पूर्वीचे आहेत.

प्रश्न– वादीने केलेल्या सुरक्षिततेच्या उपाय योजनांमुळे नि.क्र.२८१–१ ते २८१–९ वर असलेल्या फोटोमध्ये झालेली गर्दी आता होत नाही ?

उत्तर – रोज गर्दी होत नाही. परंतु सणाच्या दिवशी गर्दी होत असते.

४८. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञालेखातील परिच्छेद क्र.७ मध्ये नमुद केलेली मातंगवाडीची जागा ही सरकारने अधिग्रहीत करुन मंदिराच्या विस्तारासाठी देण्याबाबतची आहे. आता मला नि.क्र.४८ नुसार दाखल केलेले मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपुर खंडपीठ यांनी दिलेला प्रस्तावित नकाशा दाखविण्यात आला. त्या नकाशाची प्रत मला प्राप्त झालेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, अधिग्रहीत करण्यात आलेली मातंगवाडीची जागा ही पोलीस चौकी, फायर स्टेशन, चौकशी कार्यालय, सुक्युरिटी सेट, प्रतिक्षालय, बेबी फिड रुम, लॉकर्स, वॉटर आणि खुली जागा यासाठी वापर करावयाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या ताब्यात असलेल्या दुकानाची मालकी गजानन महाराज संस्थानाची आहे. मी पोट भाडेकरु या नात्याने दुकानामध्ये राहतो. मी दुकानात पोट भाडेकरु म्हणून राहतो याबाबतचा उल्लेख माझ्या लेखी जबाबात व पुराव्याच्या शपथपत्रात नमुद नाही. मी पोट भाडेकरु आहे याबाबतचा कोणताही दस्त मी अद्यापर्यंत बघितलेला नाही. माझ्या ऐकीव माहितीनुसार ज्या जागेवर माझ्या ताब्यात असलेले दुकान आहे ती जागा लिजवर आहे व आम्ही त्या दुकानाचे पोट भाडेकरु आहे. दुकान वादीने बांधलेले आहे. दुकानाच्या मालकीबाबत मी दस्त बघितलेला आहे.

प्रश्न – दुकानाचे मालक कोण आहेत ?

उत्तर – नगर पालिकेने गजानन महाराज संस्थानला लिजवर जागा दिल्यामुळे गजानन महाराज संस्थान हे दुकानाचे मालक आहेत.

४९. माझ्या लेखी बयाणातील परिच्छेद क्र.१७ मध्ये नमुद केलेला मजकूर निरर्थक व तथ्यहीन आहे कारण की सरकारच्या विविध यंत्रणांनी मंदिराच्या आतमध्ये सुरक्षिततेबाबत उपाययोजना करण्याचे निर्देशीत केलेले असून गजानन महाराज संस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी त्याबाबतची बजावणी मार्केट परिसरात केलेली आहे व मार्केट परिसर १५० फुट मंदिरापासून लांब आहे म्हणून सरकारी यंत्रणांनी दिलेले निर्देश हे निरर्थक व तथ्यहीन आहे. दि.३०.११.२०१४ रोजी मंदिराच्या मोकळ्या जागेवर अतिक्रमण करुन सामान ठेवत असल्याबाबतची वादीने मला नि.क्र.१६६ वरील नोटीस दिली होती की काय हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे विधीज्ञ श्री. बी. के. गांधी यांच्या मार्फत मी वादीने

दिलेल्या नोटीसचे उत्तर नि.क्र.१२४ नुसार दिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१२४ मधील परिच्छेद क्र.३ मधील मजकूर माझ्या सांगण्यानुसार लिहिण्यात आला असून तो बरोबर आहे. पोलीस विभाग मंदिराच्या सुरक्षिततेसाठी नोटीसा जारी करतात याबाबत मला वैयक्तीक माहिती नाही.

५०. हे म्हणणे खरे आहे की, पर्यायी दुकान शोधतांना मी करत असलेला व्यापार हा मंदिराच्या आवारातच होवू शकतो अशी धारणा ठेवून मी दुकान शोधले हा माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील मजकूर बरोबर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मंदिराच्या बाहेर दुकान लावले तर मंदिरापासून एक फरलांग अंतरापर्यंतच व्यापारामध्ये नुकसान करुन व्यापार चालु शकतो अशी धारणा ठेवून मी दुकान शोधण्याचा प्रयत्न केला हा माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील मजकूर बरोबर आहे. ज्या ४६ दुकानदारांनी दुकाने खाली केली ते मंदिराच्या बाहेर व्यापार करतात की काय हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, शेगाव येथील भैरव चौकात मी शर्मा ग्लासेस व चक्की हे माझ्या मालकीची आहे. शर्मा ग्लासेस रितेश अरुणकुमार शर्मा यांच्या मालकीची आहे व चक्की अरुणकुमार शर्मा यांच्या मालकीची आहे. अरुणकुमार शर्मा माझे वडील आहेत.

५१. हे म्हणणे खरे आहे की, शेगाव येथील आठवडी बाजारात नगर परिषद शेगाव यांनी ८० गाळ्याचे व्यापारी संकुल तयार केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, नगर परिषद शेगाव यांच्या कार्यालयासमोर नगर परिषदने तीन मजली व्यापारी संकुल बांधलेले आहे. नगर परिषद कार्यालयासमोर असलेल्या व्यापारी संकुलात १०६ गाळे आहेत की काय याबद्दल मला माहिती नाही. नगर परिषद कार्यालयासमोर असलेल्या व्यापारी संकुलातील १०६ गाळ्यांचे आवंटन अजून व्हायचे आहे की काय याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, नगर परिषद कार्यालयासमोर असलेल्या व्यापारी संकुलातील १०६ गाळ्यांमध्ये अद्यापर्यंत कोणाचाही व्यापार चालु नाही. हे म्हणणे खरे आहे की, नगर परिषद कार्यालयासमोर असलेल्या व्यापारी संकुलातील गाळे घेण्याकरीता मी अद्यापर्यंत चौकशी केली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्या संकुलाचे बांधकाम २–३ वर्षापूर्वी सुरु झाले असल्यामुळे ते अद्यापर्यंत पुर्ण झाले की नाही याबाबत मला माहिती नसल्यामुळे मी अद्यापर्यंत त्यांची चौकशी केली नाही.

५२. शेगाव येथील रेल्वे स्टेशनच्या चौकातील कॉर्नरवर नारायणी कॉम्प्लेक्स व पाटील कॉम्प्लेक्स या नावाने व्यापारी संकुल आहे की काय याबाबत मला माहिती नाही. रेल्वे स्टेशन रोडवर असलेल्या अग्रसेन भवनच्या समोर अग्रसेन शॉपींग कॉम्प्लेक्स आहे. केवलराम

पेट्रोल पंपाजवळ मुथुट फायनन्स कॉम्प्लेक्स आहे की काय याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आठवडी बाजारात वनमाळी शामजी स्वीटच्या समोर छत्रपती संभाजी राजे मार्केट आहे.

५३. हे म्हणणे खरे आहे की, श्री टॉकीज रोडवर असलेल्या मानिक स्टोअर्स समोर चांडक कॉम्प्लेक्स आहे. हे म्हणणे खरे आहे की, गांधी चौक मेन रोड येथे के. पी. स्केअर कॉम्प्लेक्स आहे. हे म्हणणे खरे नाही की, गांधी चौकात हैद्राबाद बॅक आहे. हे म्हणणे खरे नाही की, गांधी चौकात भरकादेवी कॉम्प्लेक्स आहे. हे म्हणणे खरे आहे की, वर नमुद असलेल्या कोणत्याही व्यापारी संकुलात किंवा कॉम्प्लेक्समध्ये मी दुकाने शोधण्याचा प्रयत्न केला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, वर नमुद असलेल्या व्यापारी संकुल किंवा कॉम्प्लेक्समध्ये आमचे दुकान चालु शकत नाही म्हणून मी त्यामध्ये दुकान शोधण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गजानन महाराज संस्थानपासून रेल्वे स्टेशन सुमारे दोन किलोमीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, गजानन महाराज संस्थानपासून ते रेल्वे स्टेशन पर्यंत असलेला रोड हा मुख्य रस्ता असून त्याच्या दोन्ही बाजुला दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गजानन महाराज संस्थान ते रेल्वे स्टेशनच्या मुख्य रस्त्यावर मी दुकाने शोधण्याचा प्रयत्न केला नाही.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| **(एन. डी. मेश्राम)** | **(एन. डी. मेश्राम)** |
| दिवाणी न्यायाधीश कोर्ट क्र.१, शेगांव | दिवाणी न्यायाधीश कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.१७.०३.२०२६ | दि.१७.०३.२०२६ |